मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

www.newsexpressmarathi.in » पुणे, पिंपरी-चिंचवड » शुक्रवार, दिनांक १ मार्च २०२४ । पान १

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

# पवना नदी देशातील सर्वाधिक प्रदूषित

## पवना नदीतील पाण्याचे सहा ठिकाणचे नमुने तपासण्यासाठी

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।** पिंपरी-चिंचवडकरांची जलवाहिनी असलेल्या पवना नदीच्या प्रदूषणात मोठी वाढ झाली असून देशातील सर्वाधिक प्रदूषित नदी ठरली आहे. नदीतील जीवशास्त्रीय प्राणवायूची (बायोलॉजिकल ऑक्सिजन डिमांड – बीओडी) मागणी वाढली आहे. नदीच्या नैसर्गिक पाण्याचा 'बीओडी' साधारणपणे तीनच्या आतमध्ये असावा लागतो. पवना नदीचा 'बीओडी' २५ पर्यंत गेला आहे. नदीची गुणवत्ता खालावत असल्याने तातडीने उपाययोजना करण्याची सूचना महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने (एमपीसीबी) महापालिकेला केली आहे.पिंपरी-चिंचवड शहरातून वाहणाऱ्या पवना नदीचे पात्र २४ किलोमीटर आहे. महापालिका पवना नदीतून रावेत येथील अशुद्ध जलउपसा केंद्रातून पाणी उचलते. नागरिकांना पाणीपुरवठा करणाऱ्या पवनमाईची अवस्था बिकट झाली आहे. नदीतील प्रदूषणाचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत चालला आहे. शहरातील नाल्यांद्वारे पाणी नदीमध्ये मिसळते. काही कंपन्या रसायनयुक्त सांडपाणीही थेट नदीत सोडतात. त्यामुळे नदीचे प्रदूषण वाढत आहे.



महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने जानेवारी महिन्यात पवना नदीतील पाण्याचे सहा ठिकाणचे नमुने तपासण्यासाठी घेतले होते. त्यामध्ये रावेत, चिंचवड, पिंपरी, कासारवाडी, सांगवी आणि दापोडी भागाचा समावेश आहे. रावेत परिसराचा 'बीओडी' तीन ते चारच्या आसपास असतो. त्यात कधीतरी वाढ होते. तेथील परिस्थिती चांगली आहे. रावेतपासून खाली पिंपरी-चिंचवडमध्ये 'बीओडी' वाढण्यास सुरुवात होते. चिंचवडमध्ये सात ते आठ 'बीओडी' असतो. पिंपरीत वाढ होऊन १५ ते २० पर्यंत जातो. कासारवाडीत साधारण २० ते २२ पर्यंत राहतो. सांगवी, दापोडीला २० ते २५ दरम्यान 'बीओडी' असतो. दापोडीतील 'बीओडी' २८ पर्यंत जातो. 'बीओडी'चे प्रमाण पाहता नदीच्या प्रदूषणात मोठी वाढ झाल्याचे स्पष्ट होते. नदीची गुणवत्ता खालावली आहे. प्राधान्याने नदी प्रदूषणाकडे लक्ष देण्याची सूचना प्रदूषण नियंत्रण मंडळाने केली आहे.महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे उपविभागीय अधिकारी मंचक जाधव म्हणाले की, कासारवाडी, दापोडीत 'बीओडी' वाढला आहे. नदीची गुणवत्ता खालावत चालली आहे. औद्योगिक, सांडपाणी प्रक्रिया करून नदीत सोडावे. त्याबाबत महापालिका प्रशासनाला सूचना केल्या आहेत. पर्यावरण विभागाचे सहशहर अभियंता संजय कुलकर्णी म्हणाले की, उद्योगांचे रसायनमिश्रित पाणी नदीत मिसळते. उद्योगाच्या सांडपाण्यावर प्रक्रिया करण्याचा प्रकल्प नाही. प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठी जागा मिळाली आहे. लवकरच काम सुरू केले जाणार आहे. अमृत योजनेअंतर्गत १५० दशलक्ष लिटर (एमएलडी) क्षमतेच्या सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पाचे काम चालू आहे. सांडपाणी, रसायनमिश्रित पाणी विनाप्रक्रिया नदीत सोडल्याने प्रदूषण वाढत आहे.

# प्राधिकरण बाधित भूमिपुत्रांच्या तोंडाला महायुती सरकारने पाने पुसली

## हिवाळी अधिवेशनात घोषणा केली पण, अंमलबजावणीसाठी 'तारिख पे तारीख'

**। पिंपरी-चिंचवड।** पिंपरी-चिंचवड शहराच्या विकासामध्ये योगदान देणाऱ्या शहरातील भूमिपुत्रांच्या तोंडाला पाने पुसण्याचे काम राज्यातील महायुती सरकारने केले आहे. तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभा अधिवेशनामध्ये प्राधिकरण बाधितांना साडेबारा टक्के परतावा देण्याची घोषणा केली. त्यानंतर महायुतीच्या स्थानिक नेत्यांनी मिठाई वाटली. पण, अद्याप हा प्रश्न सुटलेला नाही, अशी घणाघाती टीका शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे मावळ लोकसभा संघटक व माजी महापौर संजोग वाघेरे यांनी केली आहे. पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाने १९७२ ते १९८३ या कालवाधीत संपादित केलेल्या शेतक-यांना ६.२ टक्के परतावा आणि २ चटई क्षेत्र निर्देशांक (एफएसआय) देण्याचा प्रश्न सोडवण्याबाबत राज्य सरकारने हिवाळी अधिवेशन-२०२२ मध्ये घोषणा केली होती. त्याबाबतचा प्रस्ताव राज्य कॅबिनेट मंत्रीमंडळाच्या मंजुरीच्या प्रतीक्षेत आहे. मात्र, या प्रस्तावाला अद्याप मंजुरी मिळालेली नाही. या संदर्भात बोलताना संजोग वाघेरे म्हणाले की, राज्यात व केंद्रात महायुतीची निर्विवाद सत्ता



आहे. राज्याचे मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री धडाकेबाज निर्णय घेण्यात तरबेज आहेत. असे असतानाही पिंपरी-चिंचवडमधील भूमिपुत्रांशी संबंधित गेल्या ४० वर्षांपासून प्रलंबित असलेला प्रश्न सोडवण्यात महायुती सरकार अपयशी ठरले आहे. त्यामुळे भूमिपुत्रांमध्ये नाराजीचा सूर आहे. पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या विकासासाठी प्राधिकरणाने सन १९७२ पासून सन १९८३ पर्यंत शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित केलेल्या आहेत. १९८४ नंतर दुसरा टप्पा संपादित झाला. १९८४ नंतरच्या बाधित शेतक-यांना मोबादला मिळाला. पण, १९७२ ते १९८३ दरम्यान जमिनी संपादित झालेल्या १०६ बाधित शेतक-यांना कुठलाही मोबादला मिळालेला नाही. आजच्या घडीला चौथी पिढी परताव्यासाठी संघर्ष करीत आहेत. निवडणुकीच्या तोंडावर आश्वासनांचे गाजर दाखवणारे स्थानिक नेते भूमिपुत्रांना न्याय मिळवून देण्यास अपयशी ठरले आहेत.

> **''प्राधिकरण बाधितांना परतावा मिळणार'', अशी घोषणा महायुती सरकारच्या उदासीनतेमुळे केवळ घोषणाच राहीली आहे. अपयश झाकण्यासाठी विद्यमान खासदार भूमिपुत्रांना आशा दाखवण्याचा प्रयत्न करीत आहेत. गेल्या १० वर्षांत राज्यात आणि केंद्रातील सत्तेत असताना हा प्रश्न का सुटला नाही? असा भूमिपुत्रांचा सवाल आहे. आगामी लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर पुन्हा भूमिपुत्रांना आश्वासने दिली जात आहेत. प्राधिकरण बाधित शेतकऱ्यांच्या चौथ्या पिढीलाही न्यायायासाठी संघर्ष करावा लागत आहे. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांमध्ये ताळमेळ नाही. त्यामुळे हा प्रश्न लांबणीवर पडला आहे. शहरातील भूमिपूत्र राजकीय परिस्थितीचे शिकार ठरले आहेत, ही बाब दुर्दैवी आहे.**
>
> **– संजोग वाघेरे-पाटील,**
> **संघटक, शिवसेना (उबाठा), मावळ.**

# ११ बांधकामांसह पत्राशेडवर ‘बुलडोझर’

## कुदळवाडी, चिखलीत महापालिकेची अतिक्रमण विरोधात कारवाई सुरूच

**। पिंपरी-चिंचवड ।**

**न्यूज एक्सप्रेस मराठी।**



पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने विशेष मोहिमेतंर्गत प्रभाग क्र.२ मधील कुदळवाडी, चिखली ३० मीटर डी. पी.रस्त्यामधील सुमारे ५० हजार चौरस फुट क्षेत्रातील ११ वीट बांधकामसह पत्राशेड इत्यादींवर अतिक्रमण निष्कासनाची आज कारवाई करण्यात आली व रस्ता रुंदीकरण करण्यात आले.पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त शेखर सिंह यांच्या निर्दे शानुसार तसेच अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, शहर अभियंता मकरंद निकम, उपआयुक्त मनोज लोणकर आणि कार्यकारी अभियंता देवन्ना गट्टुवार यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी समक्ष स्थळपाहणी करुन कारवाईची माहिती घेतली व अधिकारी वर्गास सूचना दिल्या तसेच रस्त्याचे काम त्वरीत सुरु करण्याच्या सूचनाही स्थापत्य विभागास दिल्या. क,ई,फ आणि ह क्षेत्रीय कार्यालयाचे क्षेत्रीय अधिकारी अण्णा बोदडे, राजेश आगळे, सिताराम बहुरे, उमेश ढाकणे तसेच कार्यकारी अभियंता राजेंद्र राणे, उपअभियंता सुर्यकांत मोहिते, मनोज बोरसे, नरेश जाधव यांच्या नेतृत्वाखाली कनिष्ठ अभियंता संदिप वैद्य, किरण सगर, इम्रान कलाल, क्षितीजा देशमुख, चंद्रकांत पाटील, प्रियंका म्हस्के, रचना दळवी, संदिप वाडीले तसेच स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक श्वर्या मासाळ, केशव खांडेकर, निकिता फ़डतरे, श्रीकांत फ़ाळके, स्मिता गव्हाणे व मनपा कर्मचारी, महाराष्ट्र सुरक्षा बल, महाराष्ट्र पोलिस, यांच्या नियंत्रणाखाली ही कारवाई करण्यात आली. दररोज शहराच्या विविध भागात अतिक्रमण कारवाई केली जात आहे आणि यापुढेही ही कारवाई सुरू राहणार आहे.

नागरिकांनी रस्त्यांवर बेवारस वाहने उभी करुन नयेत तसेच अनधिकृत टपऱ्या, पत्राशेड आणि बॅनर्स उभारु नये. फुटपाथ स्वच्छ ठेवण्यासाठी सहकार्य करावे. आयुक्त शेखर सिंह यांच्या निर्दे शनानुसार सदर कारवाई केलेल्या ठिकाणी महापालिका प्रशासनाची परवानगी घेतल्याशिवाय पत्राशेड बांधकाम करु नये, असे आवाहन अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी केले.

# महिलांचा मतदानांचा टक्का वाढविण्यासाठी विशेष मोहिम

## महिलांनी घेतली मतदान करण्याची शपथ

**। पिंपरी-चिंचवड ।**

**न्यूज एक्सप्रेस मराठी।**




पिंपरी-चिंचवड शहरातील तिन्ही विधानसभा मतदार संघात महिला मतदारांचे प्रमाण कमी आहे. समाज विकास विभागामार्फत महिलांना ईव्हीएमचे प्रशिक्षण देण्यात आले. आपल्या कुटुंबातील महिलांची मतदार नोंदणी झाली नसेल तर ती नोंदणी करावी. महिलांचे लोकशाहीमध्ये मोठे स्थान आणि योगदान आहे. महिला मतदारांचा टक्का वाढावा, यासाठी चिंचवड विधानसभा मतदार संघामार्फत मार्गदर्शन करण्यात आले. त्यावेळी महिलांना मतदान करण्याची शपथ देण्यात आली. महिला मतदारांचे प्रमाण वाढविण्यासाठी चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे सभागृहात पिंपरी-चिंचवड महापालिका व जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने ३३ मावळ लोकसभा अंतर्गत २०५ चिंचवड विधानसभा मतदारसंघात आयोजित केलेल्या शीघ्र निदान शिघ्रो उपचार या उपक्रमात लोकशाहीचा जागर व लोकशाही संदर्भात महिलांना शपथ देण्यात आली. यावेळी समाज विकास विभागाचे उपायुक्त अजय चारठाणकर, सहायक आयुक्त श्रीनिवास दांगट यांच्यासह आदी अधिकारी, महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

राज्यात स्त्री-पुरुष मतदारांचे प्रमाण ९२५ इतके आहे. महिलांचा मतनोंदणी आणि मतदानाचा टक्का वाढावा, यासाठी महिलांसाठी विशेष मतदार नोंदणी व मतदान जनजागृती अभियान राबविण्यात येत आहे. भारत निवडणूक आयोगाच्या या संकेतस्थळावर किंवा वोटर हेल्पलाइन अँपवर ऑनलाइन पद्धतीने मतदार नोंदणी करता येत आहे. महिलांनी मतदार नोंदणी करण्यासाठी पुढे यावे. आपल्या परिचयातील महिलांना देखील मतदार नोंदणी करण्याबाबत माहिती द्यावी. या कार्यक्रमाला महिलांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. त्यांनी मतदानाची शपथ घेतली.

> **“ आमागी लोकसभा, विधानसभा निवडणुकीत महिला मतदारांचे प्रमाण वाढावे, यासाठी चिंचवड विधानसभा मतदार संघामध्ये मोठ्या जनजागृती मोहिमेचे आयोजन करण्यात येत आहे. तसेच महिला मतदारांचे प्रमाण वाढविण्यासाठी एसएमएस, आयव्हीआरएस कॉलिगसह अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून विविध विशेष मोहिमा राबविण्यात येणार आहेत. पात्र महिलांनी मतदार नोंदणी करण्याबरोबरच आगामी लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ साठी मतदान करावे.**
> **– विठ्ठल जोशी, उपायुक्त तथा मतदार नोंदणी अधिकारी, चिंचवड विधानसभा मतदार संघ-२०५**

# शिरूर मतदारसंघाचे नुकसान झाले

## राष्ट्रवादीकडून निवडणूक लढवणार : आढळराव पाटील

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** शिरूर लोकसभा मतदारसंघाचे गेली पाच वर्ष मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. निवडून आलेला माणूस फिरत नाही. जनतेची कामे करत नाही. पण दादा तुम्ही सतत संपर्क ठेवून जनतेची कामे करत आहात. अशा परिस्थितीत चुकीच्या माणसाला निवडून देण्यापेक्षा कुठल्याही परिस्थितीत तुम्ही शिरूर मधून निवडणूक लढवा. असा एक मुखीआग्रह कार्यकर्त्यांनी धरल्यामुळे तसेच राष्ट्रवादी काँग्रेसला मी जर उमेदवार मान्य असेल व मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ग्रीन सिग्नल दिल्यास राष्ट्रवादी काँग्रेस कडून लोकसभा निवडणूक लढवणार आहे.' असे मोठे वक्तव्य शिवसेनेचे उपनेते माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांनी गुरुवारी झालेल्या



पत्रकार परिषदेत केले आहे. त्यामुळे आढळराव पाटील निवडणूक मैदानात उतरणारच अशी चर्चा मतदारसंघात जोरदार पणे सुरू झाली आहे.लांडेवाडी (ता. आंबेगाव) येथे शिरूर लोकसभा मतदारसंघातील शिवसेना पक्षातील प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक झाली. यावेळी माजी आमदार शरद सोनवणे, अरुण गिरे, रवींद्र करंजखेले सुनील बाणखेले, प्रकाश वाडेकर, संतोष डोके, सचिन बांगर, प्रवीण थोरात, सचिन काजळे, विजय आढारी, बापूसाहेब शिंदे उपस्थित होते कार्यकर्त्यांच्या बैठकीत झालेल्या चर्चेविषयी बोलताना आढळराव पाटील म्हणाले, 'मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याबरोबर बुधवारी रात्री चर्चा झाली. त्यानुसार अजून शिरूरचे जागावाटप झाले नाही. चार-पाच दिवसात याबाबतचा निर्णय होईल. पण शिरूरच्या जागेवर राष्ट्रवादी काँग्रेसनेही दावा केला आहे.राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार, सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील व पक्षाचे अध्यक्ष सुनील तटकरे हे मुख्यमंत्री शिंदे यांना भेटले होते. त्यांनी सर्वाधिक आमदार व ग्रामपंचायतची संख्या आमच्याकडे असल्यामुळे ही जागा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षालाच मिळावी अशी मागणी केली आहे. त्यामुळे कदाचित ही जागा राष्ट्रवादी काँग्रेसला जाऊ शकते. किंवा शिवसेनेकडे राहू शकते.शिवसेनेकडे राहिल्यानंतर प्रश्नच उरत नाही पण जर राष्ट्रवादीकडे गेली तर त्यांचा निर्णय असेल उमेदवारी कोणाला द्यायची. जर राष्ट्रवादीकडून विचारणा झाली किंवा महायुतीकडून विचारणा झाली तर याबाबत काय करावे .याविषयी

### मैदानात उतरणारच

» मी त्यांना कोणतीही हानी पोहोचवलेली नाही. पुन्हा चर्चा करून जर त्यांच्या मनात गैरसमज असतील तर ते दूर केले जातील. खासदार डॉ. अमोल कोल्हे म्हणतात, शिरूर मध्ये माझ्या विरोधात महायुतीला उमेदवारच मिळत नाही. यासंदर्भात आढळराव पाटील म्हणाले 'ते काही पण बोलतात. त्यांच्या बोलण्याला कुठलाच आधार नसतो.' दरम्यान एकंदरीत कार्यकर्त्यांचा सूर व आढळराव पाटील यांनी केलेल्या वक्तव्यानुसार शिरूर लोकसभा मतदारसंघाच्या मैदानात आढळराव पाटील उतरणारच अशी जोरदार चर्चा शिरूर लोकसभा मतदारसंघात सुरु झाली आहे.शिरूर लोकसभा मतदारसंघाचे गेली पाच वर्ष मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

आज कार्यकर्त्यांची मते मी जाणून घेतली. यावेळी कार्यकर्त्यांनीएकमुखाने सांगितले की मुख्यमंत्री व तुम्ही जो निर्णय घ्याल. तो आम्हाला मान्य राहील. पण निवडणूक लढवाच. शिरूरच्या उमेदवारीबाबत तुम्ही वळसे पाटील व अजित पवार यांना भेटला होता का? या प्रश्नावर उत्तर देताना आढळराव पाटील म्हणाले', विकास कामांविषयी व शिरूर लोकसभा निवडणुकीच्या संदर्भात माझी भेट व चर्चा झालेली आहे .खेड तालुक्याचेआमदार दिलीप मोहिते यांनी तुमच्या उमेदवारीला विरोध केला आहे. यासंदर्भात आढळराव पाटील म्हणाले, 'या मतदारसंघात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विचाराचा उमेदवार निवडून येणे गरजेचे आहे. मोहिते यांच्या समावेत यापूर्वीही संपर्क व चर्चा झालेली आहे.

# निलेश राणे यांच्यासाठी महापालिकेच्या पायघड्या

## २५ लाख भरल्यानंतर मिळकतकराची थकबाकी शून्य

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** केंद्रीय मंत्री नारायण राणे यांचे चिरंजीव आणि माजी खासदार नीलेश राणे यांनी तीन कोटींपेक्षा जास्त मिळकतकर थकविल्यानंतरही महापालिकेने त्यांच्यासाठी पायघड्या घातल्याचे स्पष्ट झाले आहे. राणे यांनी ३ कोटी ७७ लाख ५३ हजार रुपयांच्या थकबाकीपोटी २५ लाख रुपयांचा धनादेश महापालिकेच्या कर आकारणी आणि कर संकलन विभागाकडे जमा केल्यानंतर राणे यांची उर्वरित थकबाकीची रक्कम 'शून्य' करण्यात आली आहे. राजकीय दबावातूनच महापालिकेने थकबाकी शून्य केल्याची चर्चा सुरू झाली आहे.राणे यांच्या मालकीच्या 'आर डेक्कन' या बहुउद्देशीय व्यापारी संकुलातील हॉटेल महापालिकेने थकीत मिळकतकर प्रकरणी लाखबंद केले होते. या कारवाईनंतर राजकीय वर्तुळात खळबळ उडाली होती. राणेंच्या मालकीच्या बहुउद्देशीय व्यापारी संकुलाची पाच कोटी ६०



लाख रुपये थकबाकी होती, त्यापैकी १ कोटी ४० लाख रुपये एका मजल्याची थकबाकी भरण्यात आली. उर्वरित दोन मजल्यांची तीन कोटी ७७ लाख रुपये थकबाकी भरावी, यासाठी प्रशासनाकडून वारंवार पाठपुरावा करण्यात येत होता. मात्र, राणे यांच्याकडून थकबाकी भरण्यास टाळाटाळ करण्यात येत होती. त्यामुळे या इमारतीतील हॉटेल लाखबंद करण्यात आले होते. हा प्रकार उघडकीस आल्यानंतर ठाकरे गटाच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांकडून आंदोलनही करण्यात आले होते. राणे यांच्याकडून थकबाकीची रक्कम वसूल करावी, अशी मागणीही करण्यात आली होती. दरम्यान, ३ कोटी ७७ लाख रुपयांची थकबाकी असताना राणे यांनी २५ लाख रुपयांचा धनादेश महापालिकेकडे जमा केला. त्यानंतर थकबाकीची रक्कम 'शून्य' करण्यात आली आहे. उर्वरित मालमत्तेच्या करासंदर्भात वाद सुरू असल्याने हा निर्णय घेण्यात आल्याचे कर आकारणी आणि कर संकलन विभागाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.राणे यांनी थकीत रक्कम पूर्ण न भरता त्यांचा कर माफ करण्यात आल्यानंतर ठाकरे गटाने आक्रमक भूमिका घेतली आहे. राणे यांना दिलेली सवलत सर्व थकबाकीदारांना द्यावी, अशी मागणी शहरप्रमुख संजय मोरे यांनी केली आहे. राणे यांनी ३ कोटी ७७ लाख ५३ हजार रुपयांच्या थकबाकीपोटी २५ लाख रुपयांचा धनादेश महापालिकेच्या कर आकारणी आणि कर संकलन विभागाकडे जमा केल्यानंतर राणे यांची उर्वरित थकबाकीची रक्कम 'शून्य' करण्यात आली आहे.

# जलजीवन’च्या ठेकेदारांना कोटींचा मलिदा!

## दौंड तालुक्यातील एकाही योजनेतून पाणी मिळाले नसल्याची स्थिती

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** जलजीवन मिशनच्या दौंड तालुक्यातील एकाही योजनेतून पाणी मिळाले नसल्याची स्थिती असताना ठेकेदारांना मात्र सुमारे ५५ कोटी रुपये अदा करून दौंड पंचायत समिती आणि जिल्हा परिषदेचा पाणी विभाग नामानिराळा झाला आहे. योजनेतील एकाही गावच्या नळाला पाणी आलेले नाही. नळ पाणीपुरवठ्याच्या योजनेचे कामकाज करणार्या प्रत्येक ठेकेदाराला या विभागाने जास्तीत जास्त ३ कोटी आणि कमीत कमी ४० लाख अशा रकमा अदा केलेल्या आहेत. सर्वाधिक रक्कम दिलेल्या खोपडी गावासाठी तीन कोटी रुपये अदा केलेले आहेत. या गावासाठी ३ कोटी ५३ लाख हा निविदा रकमेतील आकडा असून, तीन कोटी अदा केल्याने यातील अवघ्या पन्नास लाख रुपयांच्या रकमा ठेकेदारांच्या शिल्लक आहेत आणि योजना पूर्ण झाली की नाही? हा प्रश्न ऐरणीवरचा विषय आहे.भांडगाव गावासाठी तीन कोटी ५० लाख रुपये देण्यात आलेले आहेत. योजनेसाठी ४ कोटी १५ लाख ९१ हजार रुपयांची निविदा रक्कम आहे. योजना अद्याप पूर्ण झाली की नाही, याची खरी माहिती या विभागाचे अधिकारी देत नाहीत. लिंगाळीच्या कामासाठी १ कोटी ५० लाख रुपये देण्यात आलेले आहेत आणि या गावच्या योजनेसाठी एकूण खर्च १ कोटी ६७ लाख ८४ हजार रुपयांचा आहे. जवळपास या योजनेमध्ये ९० टक्के रक्कम दिलेली आहे. मात्र, या गावच्या योजनेचे कामकाज कुठल्या स्थितीत आहे, हे सांगणे गावकर्यांना अवघड पडत आहे. पाटेठाण गावामध्ये योजनेच्या निविदेची रक्कम एक कोटी ४० लाख ७२ हजार असून, या योजनेत देऊ केलेली रक्कम निविदा रकमेपेक्षा जास्त असून, एक कोटी पन्नास लाख एवढी अदा केलेली आहे. निविदा रकमेपेक्षा जास्त रक्कम अदा केल्यामुळे नक्की या ठिकाणी काय झालेले आहे, या विभागाच्या अधिकार्यांनी माहिती दिल्याशिवाय समजणे अवघड आहे.खानोटा गावासाठी ३ कोटी ५१ लाख १८ हजार रुपयांची निविदा रक्कम आहे. या गावच्या ठेकेदाराला २ कोटी ७० लाख रुपये सादर करण्यात आलेले आहेत. मात्र, योजना अद्यापही पूर्ण झालेली नसून ती कधी पूर्ण होणार आणि कधी नळाला पाणी येणार, या चिंतेत नागरिक असून, ठेकेदार आणि अधिकारी, याची किंचितही काळजी करीत नाहीत, अशी वस्तुस्थिती आहे. खुटबाव गावच्या नळ पाणीपुरवठा योजनेला १ कोटी ५२ लाख ३३ हजार रुपयांची निविदा रक्कम आहे. या ठेकेदाराला १ कोटी २० लाख रुपये अदा केलेले आहेत. मात्र, गावच्या योजनेचा नक्की काय विषय आहे. ती किती पूर्ण आहे, पूर्ण झाली असेल तर ती गावकर्यांना ताब्यात देण्यात आलेली आहे का, असे अनेक प्रश्न या योजनेकडे पाहताना नागरिकांसाठी डोकेदुखीचा विषय झालेला आहे.नायगाव या गावासाठी ४७ लाख आणि ८३ हजार रुपये एवढी छोटी रक्कम निविदेमध्ये दाखविण्यात आलेले आहे. या ठेकेदाराला २० लाख रुपये अदा केले आहेत. जवळपास निम्मे पैसे या ठेकेदाराला दिले असले तरी या गावच्या योजनेची आजची अवस्था काय आहे, हे गावकर्यांना सांगता येत नाही, याची माहिती हे अधिकारीही सांगत नाहीत. पडवी गावची नळ पाणीपुरवठा निविदेतील रक्कम १ कोटी ७९ लाख ८९ हजार एवढी आहे. ठेकेदाराला १ कोटी १० लाख रुपये अदा केलेत. मात्र, ही योजना मुख्य वितरिकेच्या दुसर्या टप्प्याच्या जागेसाठी गेल्या काही महिन्यांपासून बंद आहे.



### नळाला पाणी आलेले नाही

**» ठेकेदाराची माहिती आणि सरपंच आणि ग्रामसेवकांची माहिती, यात नक्की ही योजना काय आहे, हे या अधिकार्यांनी ठेकेदाराशिवाय कोणालाही सांगता येत नाही. या सर्व प्रकरणांमध्ये नळ पाणीपुरवठ्याचा फज्जा उडाला की काय, असा एका बाजूला प्रश्न असला तरी तोंडावर आलेल्या उन्हाळ्यामध्ये नागरिकांच्या या हक्काच्या नळ पाणीपुरवठ्यातील योजनेचा लाभ त्यांना मिळेल की नाही, हा प्रश्न खर्या अर्थाने ऐरणीवरचा विषय ठरलेला आहे.जलजीवन मिशनच्या दौंड तालुक्यातील एकाही योजनेतून पाणी मिळाले नसल्याची स्थिती असताना ठेकेदारांना मात्र सुमारे ५५ कोटी रुपये अदा करून दौंड पंचायत समिती आणि जिल्हा परिषदेचा पाणी विभाग नामानिराळा झाला आहे. योजनेतील एकाही गावच्या नळाला पाणी आलेले नाही.**

# केंजळ येथे महावितरणचे उपकेंद्र उभे राहणार

## शेतकर्यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे आभार मानले

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** भोर तालुक्याचा पूर्वे कडील १८ गावांमधील बागायती क्षेत्राला सुरळीत वीजपुरवठा व्हावा यासाठी महावितरणकडून केंजळ (ता. भोर) येथे ३३/११ केव्ही क्षमतेचे उपकेंद्र उभारण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या सूचनेनुसार केंजळ येथील गट नंबर ६८२मधील ८० आर क्षेत्र महावितरण कंपनीला देण्यासाठी जिल्हाधिकार्यांकडे हस्तांतरित केले जाणार आहे, अशा आशयाचे आदेश राज्याच्या महसूल व वन (मदत व पुनर्वसन) विभागाचे उपसचिव डॉ. श्रीनिवास कोतवाल यांनी पुणे विभागाच्या आयुक्तांना दिले आहे. त्यामुळे महावितरणच्या उपकेंद्रासाठी आम्ही आंदोलन करणार नाही, अशी माहिती जिल्हा परिषदेचे माजी सदस्य चंद्रकांत बाठे यांनी दिली. केंजळमध्ये महावितरणचे उपकेंद्र उभारण्याची कार्यवाही गेल्या दीड वर्षापासून सुरू आहे. मात्र, उपकेंद्र उभारणीच्या प्रस्तावात मंत्रालयीन स्तरावर वारंवार त्रुटी काढल्या गेल्या. त्रुटींची पूर्तता करून ६ महिन्यांपूर्वी फेरप्रस्ताव पाठविला होता. परंतु, मंत्रालयीन स्तरावर त्यावर अद्यापही कार्यवाही झालेली नव्हती. यासाठी पुणे-सातारा महामार्गावर आंदोलन करण्याता इशारा जिल्हा परिषदेचे माजी सदस्य चंद्रकांत बाठे यांच्यासह अनेक शेतकर्यांनी दिला होता. तसेच, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनाही याबाबत निवेदन दिले होते. त्यावर पवार यांनी दि. २१ फेब्रुवारी रोजी राज्याच्या मदत व पुनर्वसन विभागाच्या प्रधानसचिवांना त्वरित कार्यवाही करण्याची सूचना दिल्या. त्यानुसार २३ तारखेला उपसचिवांनी पुण्याच्या विभागीय आयुक्तांना संबंधित जमीन कार्यकारी अभियंता (स्थापत्य) महावितरणला देण्यासाठी जिल्हाधिकार्यांकडे हस्तांतरित करण्याचे आदेश दिले आहेत. उपमुख्यमंत्री पवार यांनी ११ सप्टेंबर २०२३ रोजी महावितरणची आढावा बैठक घेतली होती. त्यामध्ये त्यांनी केंजळ येथे महावितरणचे उपकेंद्र उभारणीचा विषय घेतला होता. आता दि. २३ फेब्रुवारीला पवार यांनी जागा हस्तांतरित करण्याचे आदेश दिल्यामुळे भोरच्या पूर्वेकडील भागातील शेतकर्यांनी पवार यांचे आभार मानले आहेत, असे बाठे यांनी सांगितले.